स्थापना : दिनांक २०-६-१९२० रजिस्टर नं. : २९६६

# दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पुणे

ISO 9001:2015 CERTIFIED

बंगला नं. ३, पोलीस अधिकारी वसाहत, सोमवार पेठ पोलीस लाईन, पुणे ४११ ०११
E-mail : punepolicesociety01@gmail.com, फोन : ०२०-२६१११९२०, २६१३०१५४, मोबाईल : ७७२०००५६७

जा. क्र. : १६१४/२०२४ दि. २८/०३/२०२४

संचालक मंडळ
सन २०२४ ते २०२९

श्री. सागर घोरपडे
अध्यक्ष

श्री. आकाश फासगे
उपाध्यक्ष

श्री. शशिकांत नरुटे
मानद सचिव

श्री. उदयकुमार काळभोर
खजिनदार

*संचालक मंडळ*
श्री. सुमित कदम
श्री. दिनेश गडांकुश
श्री. राजेंद्र मारणे
श्री. अनिल गावडे
श्री. जमीर तांबोळी
सौ. वैशाली गोडगे
सौ. आशा राठोड
श्री. गणपत गोरे
श्री. अनिल भोंग

**फक्त सभासदांकरीता**
**नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी**

## प रि प त्र क

**विषय :- संस्थेच्या सभासदांकरीता संचालक मंडळात घेण्यात आलेले हिताचे निर्णय**

----- ००० -----

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, सन २०२४-२९ कालावधीकरीता झालेल्या निवडणूकीत आमचे संचालक मंडळास निवडून दिल्याबद्दल सर्व सभासदांचे मनःपूर्वक आभार.

दिनांक २८/०३/२०२४ रोजी संचालक मंडळाची पहिली मासिक सभा पार पडलेली आहे. सदर संचालक मंडळ मासिक सभेत संस्थेच्या सभासदांकरीता खालील महत्वाचे व हिताचे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

**१. संस्थेचे पिंपरी चिंचवड आयुक्तालय व पुणे ग्रामीण येथील संस्थेचे सभासदांना संस्थेचे मुख्य कार्यालयात जाणे-येणे करीता अंतर खूप दूर असल्याने, संस्थेचे कर्मचारी सभासदांच्या सेवेकरीता त्यांच्या अडचणी दूर करण्याकरीता पिंपरी चिंचवड येथे प्रत्येक सोमवार, गुरुवार व पुणे ग्रामीण येथे प्रत्येक मंगळवार, शुक्रवार उपस्थित राहतील.**

**२. प्रत्येक मासिक सभेला नियमानूसार संचालक मंडळातील हजर असणा-या संचालकांना भत्ता प्रदान केला जातो. आगामी ०५ वर्षांकरीता संचालकांना मिळणारा भत्ता हा न स्विकारता सर्व संचालकांचा भत्ता संस्थेमध्ये जमा करुन संस्थेमध्ये येणा-या सभासद/ सेवानिवृत्त सभासद यांच्या चहापाण्याचा खर्च यामधून करण्याचा ठराव बहुमताने मंजूर करण्यात आलेला आहे.**

**३. दरवर्षी कॅलेंडर छपाईवर साधारणपणे ७ ते ८ लाख रुपयांचा खर्च होत असल्यामुळे संचालक मंडळाने यावर्षी पासून बहुमताने ठराव मंजूर करुन कॅलेंडर छपाई बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे.**

**४. गणेशोत्सवामध्ये पुणे शहर याठीकाणी भोजन व अल्पोपहार तसेच आषाढी एकादशी कालावधीत यावर संस्था गेल्या ०२ वर्षापासून साधारणपणे २४ लाख रुपयांचा खर्च करीत होती. परंतु ब-याच सभासदांच्या मागणीवरुन यावर पूर्णतः कपात करुन यावर्षी पासून हा खर्च पूर्णपणे बंद करण्याचा ठराव संचालक मंडळाने बहुमताने घेतलेला आहे.**

संचालक मंडळ मासिक सभेत घेण्यात आलेले सदर निर्णयामुळे संस्थेच्या खर्चात कपात होवून नफ्यामध्ये वाढ होणार आहे. तरी संस्थेच्या सर्व सभासदांच्या माहितीस्तव सादर.

(सागर घोरपडे)
अध्यक्ष
दि पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप
क्रेडिट सोसायटी लिमिटेड. पुणे

प्रत :-

१) पुणे शहर सर्व पो.स्टे. व शाखा
२) पिंपरी चिंचवड शहर सर्व पो.स्टे. व शाखा
३) पुणे ग्रामीण सर्व पो.स्टे. व शाखा
४) वायरलेस विभाग
५) इतर विभाग